# शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय,
## अवसरी (खुर्द), ता. आंबेगाव, जि.पुणे ४१२ ४०५

दूरध्वनी क्र. ०२१३३-२३०५८२ फॅक्स क्र. ०२१३३-२३०५८३ ई मेल - gcoeara@gmail.com
वेबसाईट :www.gcoeara.ac.in


जा.क्र.शाअसंमअ/विवि/२०१६/ 4153 दिनांक : 19 DEC 2016

## विद्यार्थ्यासाठी महत्वाची सूचना

या महाविद्यालयातील सर्व EBC विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की, "डॉ.पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना शैक्षणिक वर्ष २०१६-१७" या साठी ज्या विद्यार्थ्यांना ऑनलाईन अर्ज भरावयाचे आहे. अशा विद्यार्थ्यांनी www.dtemaharashtra.gov.in/ebc2016 या संकेत स्थळावर राजश्री छत्रपती शाहु महाराज शैक्षणिक शुल्क प्रतिपुर्ती योजनेकरीता भरलेल्या अर्जाचा Application ID चा वापर करुन वसतिगृह निर्वाह भत्ता योजनेची महिती भरावयाची आहे. तरी संबंधीत विद्यार्थ्यांनी संगणक प्रणालीमध्ये ऑनलाईन. अर्जाची माहिती दिनांक ३० डिसेंबर २०१६ पर्यत भरावी. सदर अर्ज व्दिप्रतीत विद्यार्थी विभागात सर्व कागदपत्रासहीत जमा करावे. व अर्जासोबत व्दिप्रतीत प्रतिज्ञापत्र व बोनाफाईड प्रमाणपत्र दिनांक ३० डिसेंबर २०१६ पर्यत जमा करावे.

**ज्या विद्यार्थ्यांनी या सूचनापूर्वी "डॉ.पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना शैक्षणिक वर्ष २०१६-१७" या साठी व्दिप्रतीत अर्ज सादर केलेले आहेत. त्यांनी सुध्दा व्दिप्रतीत प्रतिज्ञापत्र व बोनाफाईड प्रमाणपत्र दिनांक ३० डिसेंबर २०१६ पर्यत जमा करावे.**
**मुदतीनंतरचे अर्ज स्विकारले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.**

19/12/16

(डॉ.अ.शि.पंत)
प्राचार्य,
शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय,
अवसरी (खुर्द) ता. आंबेगाव जि. पुणे.

प्रत-१. विभागप्रमुख -- स्वयंचल अभि./संगणक अभि./अणुविद्यत अभि./उपकरणीकरण अभि./यंत्र अभि./स्थापत्य अभि./उपयोजित विज्ञान/कर्मशाळा.त्यांनी ही सूचना विभागीय सूचना फलकावर लावावी
२.सूचना फलक - मुलांचे वसतिगह - क्र १ व २
३.सूचना फलक - मुलींचे वसतिगह
४.सर्वसाधारण सूचना फलक
५. श्री. परेरा. यांना संस्थेच्या website वर display करण्यासाठी

## "डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना" शैक्षणिक वर्ष २०१६-१७

साध्या पेपरवर विद्यार्थी वडील / आई/ पालकांच्या सहमतीने सादर करावयाचे प्रतिज्ञापत्र

१. मी/ आम्ही डॉ. पंजाबराव देशमुख वसतीगृह निर्वाह भत्ता योजनेसाठी पात्र असुन विद्यार्थ्याचे पालक अल्पभुधारक शेतकरी आहेत किंवा नोदणीकृत मजुर आहेत. तसेच वसतीगृहात प्रवेश घेतलेला आहे. तसेच याव्यतिरिक्त इतर कोणतेही उत्पन्नाचे साधन (उदा. व्यावसाय/व्यापार/नोकरी इत्यादी ) किंवा उत्पन्नाचे स्त्रोत नाही.

२. मी / आम्ही महाराष्ट्र राज्याचा / वादग्रस्त महाराष्ट्र कर्नाटक सीमावर्ती क्षेत्रातील अधिवासधारक आहे

३. माझा प्रवेश हा शासनाच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रीयेव्दारे (CAP) झालेला आहे.

४. मी / आम्ही फक्त डॉ. पंजाबराव देशमुख वसतीगृह निर्वह भत्ता योजनेसाठी सवलतीचा लाभ मंजुरीस्तव अर्ज करीत आहे. वसतीगृह निर्वाह भत्याच्या अन्य कोणत्याही योजनेसाठी अर्ज केलेला नाही व करणार नाही, अशी हमी देत आहे.

५. मी प्रवेश घेतलेल्या अभ्यासक्रमाच्या संस्थेत शिक्षणासाठी वर्गात उपस्थित राहणे व प्रत्येक सत्राची परिक्षा देणे मला बंधनकारक आहे. याची मला जाणीव आहे. मी एखादयासत्राची (सेमिस्टरची) परिक्षा दिलेली नसल्यास अथवा एखादया वर्षात अनुतीर्ण झाल्याने पुढील वर्षी प्रवेश न मिळाल्याने सदर योजना लागू राहणार नाही मी अभ्यासक्रम पूर्ण करतांना एकुण कालावधीत दोन किंवा त्यापेक्षा अधिक वेळी पूर्णत: अनुतीर्ण झाल्याने त्या अभ्यासक्रमाच्या पुढील शैक्षणिक वर्षासाठी मला प्रवेश मिळाला नसेल तर उर्वरित अभ्यासक्रमाच्या कालावधीसाठी मला लाभ मिळण्यास मी अपात्र राहीन. याची मला जाणीव आहे.

६. मी / आम्ही संस्थेला दिलेली अर्जात नमुद केलेली माहीती चुकीची अथवा दिशाभुल करणारी नाही संस्थेला सादर केलेली माहिती चुकीची अथवा दिशाभूल करणारी आहे असे निदर्शनास आल्यास उर्वरित कालावधीसाठी मला लाभ मिळणार नाही. तसेच मला मिळालेली लाभाची रक्कम व्याजासह माझ्याकडून वसूल करण्यात येईल. त्यापुढे मला निर्वाह भत्ता मिळण्यास प्रतिबंधित केले जाईल याची मला जाणीव आहे व होणाऱ्या परिणामास किंवा शिक्षेस सर्वस्वी मी / आम्ही स्वत: जबाबदार राहील

७. माझ्या स्वत:च्या चुकीने / वर्तनामूळे शैक्षणिक प्रगती करीत नसेल, पूर्व परवानगी शिवाय मी अनियमित गैरहजर राहत असेल असे संस्थाप्रमुखाच्या निदर्शनास आले. तर माझा निर्वाह भत्ता रक्कम त्वरीत थांबविण्यात येईल किंवा समाधान न झाल्यास रद्द करण्यात येईल. याची मला जाणीव आहे.

८. मी मध्येच अभ्यासक्रम सोडून गेलो तर मला प्रदान केलेल्या लाभाची रक्कम शासनास योग्य वाटल्यास माझ्याकडून वसूल करू शकेल याची मला कल्पना आहे.

९. प्रस्तुत योजनेच्या अंमलबजावणीबाबतच्या कोणत्याही पुर्वसूचना न देता बदल अथवा सुधारणा करण्याचे अधिकार शासनास राहतील व बदल केल्यामुळे आमचे नुकसान झाल्यास मी / आम्ही किंवा संस्थां शासना विरूध्द दावा / तक्रार करणार नाही.

विद्यार्थ्यांची सही | विद्यार्थ्यांच्या पालकांची सही

(नाव:- ____________________) | (नाव:-____________________)

ॲप्लीकेशन आयडी : _______________

संस्था प्रमुखाची सही व शिक्का

# बोनाफाईड प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, श्री / श्रीमती ____________________________________

ॲप्लीकेशन आयडी ________________ यांनी शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मध्ये ____________________________________________________________

____________________________________________________________

(महाविद्यालयाचे नाव व डीटीई कोड सहीत) महाविद्यालयात ______________________ (अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, वास्तुशास्त्र, एचएमसीटी, एमबीए, एमएमएस,एमसीएम) या पदविका / पदवी / पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेला आहे, व त्याआधारे वसतीगृहात शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मध्ये प्रवेश घेतलेला आहे. तो /ती नियमित महाविद्यालयामध्ये अभ्यासक्रमाचे शिक्षण घेत असून त्यांचे वर्तन चांगले आहे. त्यांना डॉ. पंजाबराव देशमुख वसतीगृह निर्वाह भत्ता योजना मंजुरीसाठी शिफारस करण्यात येत आहे.

दिनांक : ____ / _____ / _______

वसतीगृह प्रमुखाची सही व शिक्का,

वसतीगृह नोंदणी क्रमांक : ________________________________________